| MHJN100002062026 | **<u>निशाणी क्र.०१ खालील आदेश</u>**<br>(पारीत दि. १७/०३/२०२६) |
|---|---|

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी मुंबई वारसाहक्क कायद्याचे कलम ३ व ७ नुसार मयत नामे **<u>लक्ष्मण डिगांबर देशमुख</u>** यांचे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी सादर केला आहे.

२. अर्जदारांनी असे कथन केले आहे की, मयत **<u>लक्ष्मण डिगांबर देशमुख</u>** हे अर्जदार क्र. १ चा मुलगा, अर्जदार क्र. २ चे पती व अर्जदार क्र. ३ ते ४ यांचे वडील होते व ते **दिनांक <u>०६/०५/२०१९</u>** रोजी मौजे ढोकसाळ, ता. मंठा, जि. जालना येथे मयत झाले आहेत. अर्जदार पुढे असे कथन करतात की, मयतास अर्जदारांव्यतिरिक्त ईतर कुठलेही कायदेशीर वारस नाहीत. तरी अर्जदार हेच मयत **<u>लक्ष्मण डिगांबर देशमुख</u>** यांचे कायदेशीर वारस आहेत. तरी अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामाकरीता मयताच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता अर्जदारांनी सदर अर्ज मंजुर होण्यास विनंती केली आहे.

३. अर्जदारांतर्फे वृत्तपत्रामध्ये जाहीर प्रगटन काढून हरकत मागविण्यात आली.

सदरचे जाहीर प्रगटन हे दिनांक ११/०२/२०२६ रोजीच्या दैनिक **'पुण्यनगरी'** आवृत्तीमध्ये प्रसिध्द करण्यात आले. परंतु ३० दिवसांच्या कालावधीत सदर प्रकरणात कोणीही हरकत उपस्थित केलेली नाही. त्यामुळे सदर प्रकरण विना हरकत, विना उजर आणि विना आक्षेप चालविण्यात आले आहे.

**४.** अर्जदार क्र. ३ भरत लक्ष्मण देशमुख यांनी सदर अर्जाच्या पुष्ठयर्थ स्वतःचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. ८ वर दाखल केले व त्यांच्या सरतपासात त्यांनी अर्जाशी सुसंगत बाबी शपथेवर कथन केल्या आहेत. अर्जदार क्र. ३ यांनी स्वतःच्या आधारकार्डची प्रमाणीत प्रत नि.क्र. ९ वर दाखल केली आहे. अर्जदारांतर्फे कागदोपत्री पुराव्यात नि.क्र. १० वर मयत **लक्ष्मण डिगांबर देशमुख** यांच्या मृत्युप्रमाणपत्राची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. तसेच नि.क्र. ११ ते १२ वर अनुक्रमे अर्जदार क्र. २ व ४ यांच्या आधारकार्डच्या प्रमाणीत प्रती दाखल केल्या आहेत. नि.क्र. १३ वर दैनिक पुण्यनगरी मध्ये प्रसिध्द झालेले जाहीर प्रगटन दाखल केले आहे. सदर अर्जात हरकतदार कोणीही नसल्याने अर्जदारांचा पुरावा व प्रस्तुत दस्तऐवज विना उजर व आक्षेपविना राहिले आहे.

**५.** अर्जदारांनी पुरावा बंद केल्याबाबतची पुरशिस निशाणी क्र. १४ वर दाखल केली आहे. संपूर्ण दस्तऐवजांचे अवलोकन केले असता व वकिलांचा युक्तीवाद ऐकला असता, अर्जदार क्र. १ ही मयताची आई, अर्जदार क्र. २ ही मयताची पत्नी, अर्जदार

क्र. ३ व ४ हे मयताची मुले असून अर्जदार क्र. १ ते ४ हेच मयत नामे **लक्ष्मण डिगांबर देशमुख** यांचे ऐकमेव वर्ग – १ वारस असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे अर्जदार क्र. १ ते ४ यांना वारस प्रमाणपत्र देणे न्यायसंगत वाटते. करीता खालील आदेश.

## आ दे श

१) अर्ज **मंजुर** करण्यात आला.

२) अर्जदार क्र. १ **भागीरथी भ्र. डिगांबर देशमुख**, अर्जदार क्र. २ **लता भ्र. लक्ष्मण देशमुख,** अर्जदार क्र. ३ **भरत लक्ष्मण देशमुख,** व अर्जदार क्र. ४ **हरिभाऊ लक्ष्मण देशमुख** हे सर्व मयत **लक्ष्मण डिगांबर देशमुख** यांचे कायदेशीर वारस असल्यामुळे त्यांनी आवश्यक ते न्यायालयीन शुल्क अदा केल्यानंतर त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by LOTUS P DHANVE
Date: 2026.03.17 15:33:57 +0530

दिनांक– १७/०३/२०२६.

**(श्रीमती एल. पी. धन्वे)**
दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर),मंठा.

**<u>प्र मा ण प त्र</u>**

प्रमाणीत करण्यात येते की, पी.डी.एफ. संचिकेतील प्रत्येक शब्द न शब्द मुळ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नावे– अक्षय ईश्वर देशपांडे

न्यायालयाचे नाव– दिवाणी व फौजदारी न्यायालय (क.स्तर), मंठा

न्यायनिर्णयाची दिनांक – १७/०३/२०२६

स्वाक्षांकीत/–
लघुलेखक (नि.श्रे.)